CNR No. MHRG120003962018 संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १५४/२०१८
महेंद्र वि. शोभा

## निशाणी क्र.२७ कडील आदेश

प्रस्तुतचा अर्ज फिर्यादीने परक्राम्य संलेख अधिनियम कलम १४३ (अ) नुसार आरोपीकडून धनादेशाच्या २० टक्के रक्कम वसूल करुन मिळण्यासाठी दाखल करण्यात आला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, फिर्यादीस खाजगी कामाकरीता आर्थीक निकड असून आरोपी केसचे कामकाज चालवण्यास टाळाटाळ करत आहे. त्यामुळे फिर्यादीने प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. आरोपीने निशाणी क्र.६५ कडे आपले म्हणणे दाखल करुन तिची फसवणूक झाली आहे. तिने फिर्यादीला चेक दिलेलेच नाही. तिला व्यवहार ज्ञान नाही. ती धुणे भांडे करणारी वयोवृध्द महिला असून केस चालविण्यास तयार आहे. तसेच २० टक्के रक्कम भरणे तिला शक्य होणार नाही या कारणास्तव आरोपीने प्रस्तूतचा अर्ज फेटाळण्याची मागणी केली आहे. फिर्यादीतर्फे विद्वान वकील श्री. एम. एम. ठाकूर आणि आरोपीतर्फे विद्वान वकील श्री. ए. ए. चोगले यांचा युक्तीवाद ऐकला. फिर्यादीच्या वकीलांनी त्यांच्या युक्तीवादाच्या समर्थनात ना. सर्वोच्च न्यायालय यांच्या **G. J. Raja vs. Tejraj Surana**, (2019) 19 SCC 469 या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. ज्यामध्ये ना. सर्वोच्च न्यायालय यांनी "24 In the ultimate analysis, we hold Section 143A to be prospective in operation and that the provisions of said Section 143A can be applied or invoked only in cases where the offence under Section 138 of the Act was committed after the introduction of said Section 143A in the statute book.” असे ग्राहय धरले आहे.

२. प्रस्तूतची फिर्याद परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ कलम १३८ नुसार चेकची रक्कम रुपये ४,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख मात्र) आरोपीने परतफेड केली नसल्यामुळे त्याला शिक्षा होण्याकरीता दाखल करण्यात आली आहे. प्रस्तूतचे प्रकरण संक्षिप्त केसच्या स्वरुपात दिनांक २९/११/२०१८ रोजी दाखल झाले असून आरोपीने त्याच्यावर ठेवण्यात आलेले दोषारोप नाकारुन खटल्यास पुढे जाण्याची तयारी दर्शवली आहे. दिनांक ०७/०७/२०१२ रोजी फिर्यादीने निशाणी क्र. ३६ कडे पुराव्याचा प्रतिज्ञालेख सुध्दा दाखल केला आहे. या ठिकाणी असे नमूद करावेसे वाटते की, प्रस्तूतचा अपराध परक्राम्य संलेख अधिनियम मधील २०१८ च्या दुरुस्ती नंतरचा असल्यामुळे

प्रस्तूत प्रकरणात ना. सर्वोच्च न्यायालय यांच्या **G. J. Raja vs. Tejraj Surana** या प्रकरणातील न्यायनिर्णय सुध्दा फिर्यादीस उपयुक्त ठरतो. या सर्व कारणास्तव आरोपीने धनादेशाची रक्कम रुपये ४,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख मात्र) च्या २० टक्के रक्कम रुपये ८०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये ऐंशी हजार मात्र) फिर्यादीस अंतरिम भरपाई म्हणून परक्राम्य संलेख अधिनियम १८८१ कलम १४३ (अ) च्या तरतूदीनुसार देणे आवश्यक असल्याच्या मतास मी पोहचलो आहे. करीता मी खालील आदेश पारीत करतो-

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. आरोपीने प्रस्तूत आदेशापासून ६० दिवसाच्या आत चेकची रक्कम रुपये ४,००,०००/- (अक्षरी रक्कम रुपये चार लाख मात्र) च्या २० टक्के रक्कम रु. ८०,०००/- (अक्षरी रक्कम रुपये ऐंशी हजार मात्र) फिर्यादीस अंतरिम भरपाई म्हणून द्यावी.

३. प्रस्तूत प्रकणातून आरोपी निर्दोष मुक्त झाल्यास फिर्यादी आरोपी कडून प्राप्त झालेली अंतरिम भरपाईची रक्कम रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया यांनी संबंधीत वर्षाच्या सुरुवातीस जाहीर केलेल्या व्याजाच्या दरानुसार व्याजासह ६० दिवसात देण्यास बाधील राहील.

४. उपरोक्त अंतरिम भरपाईची रक्कम आरोपीने देण्यास कसून केल्यास फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४२१ नुसार सदर भरपाईची रक्कम दंडाच्या रकमेप्रमाणे वसुल करण्यास पात्र आहे.

५. उपरोक्त अंतरिम भरपाई देण्यात आलेली अगर वसुल करण्यात आलेली रक्कम परक्राम्य संलेख अधिनियम कलम १३८ नुसार लादण्यात येणारा दंड अथवा फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३५७ प्रमाणे देण्यात येणारी भरपाईच्या रकमेतून वजा करण्यात यावी.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

SANDEEP G SARODE
Digitally signed by SANDEEP G SARODE
Date: 2023.09.25 17:33:45 +0530

(सं. गं. सरोदे)

दिनांक : २५/०९/२०२३

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, मुरुड